# भाग एक

## पोलीस पाटलांचे प्रशिक्षण, अधिकार व कर्तव्ये

१.[१] **प्रास्ताविक**—गाव प्रमुख म्हणून संकीर्ण स्वरूपाची पुष्कळशी कर्तव्ये पार पाडावयाची असतात ती अशी :—

| | |
|---|---|
| (१) पोलीस नियमपुस्तिका, १९५९ खंड तीन, नियम ४९३ (२) (अ) व (ब). | (क) आजारी प्रवाशांची काळजी घेणे |
| (२) शा. नि., वि. वि., क्र. १३२६, दिनांक २५ एप्रिल १८८१. | (ख) निधान निधी सापडल्यास कळवणे. |
| (३) शा. नि., वि. वि., क्र. २८० दिनांक १९ एप्रिल १९२१. | (ग) निवृत्तिवेतनधारी व्यक्तीच्या मृत्यूबद्दल कळवणे. |
| (४) पोलीस नियमपुस्तिका, १९५९ खंड तीन, नियम ४९३ (३). | (घ) नौकाभंग झालेल्या खलाशांना व प्रवाशांना मदत करणे. |
| (४) (क) शा. नि., वि. वि., क्र. १४५३/३३ दिनांक २६ फेब्रुवारी १९३७, नियम १६. | (च) ज्या खेड्यामध्ये तलाठी नसेल तेथे किंवा जेथे तलाठी असून तो अशा ठिकाणी भूकंप, पूर, आग, हिमवर्षा इ. सारख्या नैसर्गिक आपत्ती ओढवण्याच्या दिनांकास अनुपस्थित असेल अशा ठिकाणी अशा नैसर्गिक आपत्तीसंबंधी तलाठ्याने ज्याप्रमाणे प्रतिवेदन द्यावयाचे असते त्याप्रमाणे प्रतिवेदन देणे. |
| (५) [पोलीस नियमपुस्तिका, १९५९ खंड तीन, नियम ४९ (९)] ग्राम पोलीस अधिनियम कलम ६. | (छ) खेड्यातून जाणारे रेल्वेमार्ग, तारमार्ग, पूल इत्यादींची आणीबाणीच्या काळात संरक्षण करणे. |

तथापि, आपली सर्वांत महत्त्वाची कर्तव्ये म्हणजे आपल्या गावात कायदा व सुव्यवस्था राखणे आणि महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियमाच्या कलम सहा अन्वये गुन्ह्यास प्रतिबंध करणे व गुन्ह्याचा शोध करणे ही आहेत आणि ती आपणास जास्त कार्यक्षमतेने पार पाडता यावीत यासाठी हे अनुदेश देण्यात येत आहेत.

२. **पोलीस पाटलांची नियुक्ती.**—या पुस्तिकेसोबत परिशिष्ट (ग) म्हणून जोडलेल्या, महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील (सेवाप्रवेश, वेतन, भत्ते व इतर सेवा शर्ती आदेश १९६८ च्या खंड आठ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे.

पुढील प्रकारची कोणतीही व्यक्ति पोलीस पाटील म्हणून नियुक्त होण्यास पात्र असणार नाही—

(क) नियुक्तीच्या वेळी पंचवीस वर्षापेक्षा कमी किंवा पंचेचाळीस वर्षापेक्षा अधिक वय असणारी व्यक्ती;

(ख) प्राथमिक शाळेतील इयत्ता सहावी उत्तीर्ण न झालेली किंवा तत्सम किंवा त्यापेक्षा अधिक अर्हता धारण करीत नसलेली व्यक्ती.

मात्र असे की, किमान अर्हता धारण करणारा कोणताही योग्य उमेदवार उपलब्ध नसेल तर सक्षम प्राधिकारी प्राथमिक शाळेचे निदान चौथी इयत्ता उत्तीर्ण झालेल्या एखाद्या उमेदवाराची नियुक्ती करू शकेल.

(ग) संबंधित गावची रहिवाशी नसलेली व्यक्ती.

(घ) पोलीस पाटलाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी शारीरिकदृष्टया अक्षम असलेली व्यक्ती, मात्र असे की, आवश्यक वाटल्यास सक्षम प्राधिकारी उमेदवारास त्याची शारीरिक पात्रता ठरवण्यासाठी वैद्यकीय तपासणी करून घेण्यास फर्मावू शकेल.

(च) सक्षम प्राधिकाऱ्याने संक्षिप्त चौकशीनंतर दु:शील ठरवलेली व्यक्ती किंवा त्या प्राधिकाऱ्याच्या मते पोलीस पाटील म्हणून नेमण्यास अयोग्य ठरवणारे काही पूर्वचरित्र असणारी व्यक्ती.

उक्त आदेशाच्या खंड चार मध्ये असे उपबंधित केले आहे की, सुरुवातीस पाच वर्षांच्या कालावधीसाठी पोलीस पाटील म्हणून एखाद्या व्यक्तीस नियुक्त करता येईल व त्या व्यक्तीचे काम त्या कालावधीत समाधानकारक असल्याचे आढळून आल्यास तिच्या नियुक्तीचे एका वेळी पुढील ५ वर्षांच्या कालावधी-साठी नूतनीकरण करता येईल मात्र ६० वर्षे वय पूर्ण झालेली कोणतीही व्यक्ती पोलीस पाटील म्हणून कामे करीत राहणार नाही.

आणखी असे की, सक्षम प्राधिकारी पोलीस पाटलाचे काम, वर्तणूक किंवा प्रकृती यांच्या कारणास्तव अयोग्य वाटल्यास त्याची सेवा लेखी नमूद करावयाच्या कारणावरून समाप्त करू शकेल. त्यापूर्वी प्राधिकारी त्याला इष्ट ते अभिवेदन करण्याची संधी देईल आणि आदेश काढण्यापूर्वी त्याच्या अभिवेदनाचा (कोणतेही असल्यास) विचार करील.

३. **पोलीस पाटलांचे प्रशिक्षण.**—पोलीस पाटलांना प्रशिक्षण मराठीतून देण्यात यावे व प्रशिक्षण संपल्यानंतर त्यांची परीक्षा घ्यावी.

४. **अधिकार व कर्तव्ये.**—वेगवेगळ्या केंद्रीय व राज्य अधिनियमानुसार आपणाला असलेले अधिकार व आपली कर्तव्ये पुढे दिली आहेत :—

**(क) महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, १९६७.**—या अधिनियमात आपले अधिकार व कर्तव्ये प्रामुख्याने दिली आहेत.

(१) (सहा) या अधिनियमाच्या कलम ५ (२) अन्वये आपण ग्राम पोलीस प्रमुख आहात व त्या नात्याने स्थानिक दंडाधिकारी व पोलीस यांना आपल्या गावातील गुन्ह्याच्या परिस्थितीबाबत माहिती देणे हे आपले कर्तव्य आहे.

महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम (सेहेचाळीस), १९६७ कलम ५, (६) कलम ६.

(२) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने स्वतःचे कर्तव्य पार पाडीत असताना आपली मदत मागितली असल्यास आपल्या अधिकाराच्या मर्यादित हुरतऱ्हेची मदत आपण त्याला द्यायला पाहिजे.

(३) आपण पोलीस व दंडाधिकारी यांनी दिलेले सर्व आदेश व अभिपत्रे यांचे पालन करणे व ते अंमलात आणणे आणि सार्वजनिक शांततेवर परिणाम करणारी गुप्त वार्ता मिळवून ती पोलीस ठाणे अंमलदारास कळवणे आवश्यक आहे.

(४) आपल्या गावाच्या हद्दीत अपराध व सार्वजनिक उपद्रव या गोष्टी घडू देण्यास आपण प्रतिबंध केला पाहिजे आणि अपराध्यांना शोधून न्यायासनापुढे आणले पाहिजे. महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम, १९६७ च्या कलम ९(३) मध्ये असे नमूद केले आहे की, पोलीस पाटलाने कार्यकारी दंडाधिकाऱ्याला गुन्ह्याच्या परिस्थितीबाबत माहिती देत असले पाहिजे. गुन्ह्याबाबतचे काम पोलीस विभागाला हाताळावे लागत असल्यामुळे पोलीस पाटलांनी अशी माहिती आपल्या संबंधित पोलीस ठाण्यांकडे आठवड्यातून एकदा पाठवली पाहिजे.

(५) मुळात कोणत्याही नात्याने नियुक्त झालेल्या सर्व ग्राम सेवकांनी ही कर्तव्ये पार पाडण्याच्या बाबतीत आपणास मदत केली असे त्यांच्यावर बंधन आहे, तर आपणही आपल्या बाजूने (८) आपण ग्राम आस्थापना अथारीतीने व्यवस्थित ठेवली पाहिजे की, जेणे करून लूटमार, शांतताभंग आणि जनतेला व गावच्या समाजाला घातक ठरतील अशी कृत्ये यांपासून जास्तीत जास्त सुरक्षितता मिळेल.

(७) कलम ७.
(८) कलम ८.

(९) या अधिनियमाच्या कलम १६ अन्वये क्षेत्रातील बेवारशी मालमत्ता ताब्यात घेण्याची शक्ती आपणास प्रदान करण्यात आली आहे.

(९) कलम १६.

**(ब) फौजदारी प्रक्रिया संहिता.**—(१) पुढील गोष्टींसंबंधी आपणाकडे कोणतीही माहिती असल्यास ती जवळच्या दंडाधिकाऱ्याला किंवा पोलीस ठाण्याला कळवणे आपणावर संहितेच्या ४० व्या कलमानुसार बंधनकारक आहे.

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अधिनियम (दोन) १९७४.

(क) चोरीचा माल विकणाऱ्या किंवा घेणाऱ्या व्यक्तीचे राहण्याचे ठिकाण.

(ख) ठग, लुटारू, फरारी कैदी किंवा उद्घोषित अपराधी असल्याचा ज्या व्यक्तीबाबत रास्त संशय असल्याचे आपणास माहीत असेल, अशी व्यक्ती आपल्या क्षेत्रात येणे किंवा राहत असणे.

(२६) ना. नि., गृ. वि., क्र. ७२०९-दोन, दिनांक ११ एप्रिल १९२७.

(ग) आपल्या गावात जमानत योग्य नसलेला अपराध किंवा भारतीय दंड संहितेच्या कलम १४३, १४४, १४५, १४६, १४७ किंवा १४८ खालील अपराध म्हणजे बेकायदेशीर जमावापैकी एक असणे, अशा जमावात सामील होणे किंवा दंगाधोपा करणे हे अपराध करणे किंवा करण्याचा उद्देश असणे.

(घ) आपल्या गावात अथवा गावाजवळ कोणी इसम अकस्मात किंवा अस्वाभाविकपणे मरण पावला आहे किंवा संशयास्पद मरण पावलेला आहे. ती गोष्ट किंवा मृत्यु घडून आल्याबद्दल योग्य संशय घेण्यासारखी हकिगत असून कोणतेही प्रेत किंवा प्रेताचा भाग आढळून येणे किंवा अशा गावांतून कोणताही इसम अशा इसमासंबंधीने विगर जामिनकीचा अपराध करण्यात आल्याबद्दल योग्य संशय घेण्यासारखी हकिगत असून नाहीसा होणे.

(च) राज्याबाहेर परंतु आपल्या गावाजवळ, बनावट नोटा किंवा नाणी बनवणे, खून करणे, दरोडा घालणे, जाळपोळ किंवा घरफोडी यांसारखे विविध गंभीर अपराध घडणे किंवा घडवण्याचा उद्देश असणे.

(२७) फौजदारी व्यवहार संहिता कलम १७४ ग्राम पोलीस अधिनियम, कलम ११.

(छ) जिल्हा दंडाधिकाऱ्याने आपणास [ज्यासंबंधी आदेश दिले असतील अशी] सुव्यवस्था राखणे व गुन्ह्यास प्रतिबंध करणे यासंबंधीच्या दिलेल्या आदेशाला बाध येणाऱ्या इतर कोणत्याही गोष्टी.

(२) (२७) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १७४ अन्वये जेव्हा आपणास खालील प्रकारची माहिती मिळाली.

(क) एखाद्या व्यक्तीने आत्महत्या केलेली आहे,

(ख) एखादी व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीकडून किंवा प्राण्याकडून किंवा यंत्राद्वारे किंवा अपघाताने ठार झालेली आहे, किंवा

(ग) कोणीतरी अपराध केला आहे असा संशय निर्माण करणाऱ्या परिस्थितीत एखादी व्यक्ती मरण पावली आहे.

तेव्हा आपण पंच म्हणून काम करण्यासाठी सुजाण अशा दोन किंवा तीन गावकऱ्यांसह त्या ठिकाणी जावे व ग्राम-पोलीस अधिनियम (१३) अन्वये विहित केल्याप्रमाणे विहित नमुना एम्. एन्. ६१ यामध्ये पंचनामा तयार करावा. शरीरावर आढळणाऱ्या जखमा, हाड मोडण, खरचटणे आणि इतर दुखापतीच्या खुणा यांचे त्यात वर्णन करावे आणि अशा खुणा कोणत्या रितीने व कोणत्या शस्त्राने, बॅगने किंवा साधनाने केल्या गेल्या असल्याचे दिसते ते नमूद करावे. आपण पंचांबरोबर या पंचनाम्यावर सही केली पाहिजे आणि तो तात्काळ आपल्या फौजदारामार्फत उपविभागीय दंडाधिकाऱ्याकडे पाठवला पाहिजे. काही अपराध घडला आहे असा संशय असेल तर आपण मृतदेहाचे दफन किंवा दहन करण्यास परवानगी देता कामा नये आणि पोलीस अधिकारी येईपर्यंत मृतदेह आहे तसा राहील याची खात्री करून घेतली पाहिजे.

(२८) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७४ व महाराष्ट्र ग्राम-पोलीस अधिनियम, १९६७, कलम १३ (३), मुंबई अधिनियम, क्रमांक २५, १९४९.

(ग) **मुंबई दारूबंदी अधिनियम.**—(१) या अधिनियमान्वये आपणावर पुढील गोष्टी बंधनकारक आहेत :—

मुंबई दारूबंदी अधिनियम, १९४९ चे कलम १३४.

(क) या अधिनियमाच्या कोणत्याही उपबंधाचा कोणताही भंग झाल्याचे आपणास कळल्यास जवळचे पोलीस ठाणे किंवा इतर कोणताही अधिकारी किंवा यासंबंधात प्राधिकृत व्यक्ती यांना तात्काळ माहिती देणे.

(ख) अशा तऱ्हेचा कोणताही भंग होण्याची शक्यता किंवा संभव आहे असे मानण्यास कारण असेल तेव्हा त्या कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी आपल्या अधिकाराच्या मर्यादेत सर्व रास्त उपाय योजणे.

(२) शासकीय अधिसूचना, महसूल विभाग क्रमांक १०४८४/४५ (एस), दिनांक १६ जून १९४९ द्वारा अधिनियमाच्या कलम १२५ अन्वये असलेले अधिकार आपणाकडे विहित केले आहेत. याचा अर्थ असा की, आपणास, उघड्या जागी असलेला किंवा वाहून नेला जात असलेला कोणताही मादक पदार्थ, भांग, मोहाची फुले किंवा रस किंवा या अधिनियमाखाली अथवा उत्पादक शुल्काशी संबंधित त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली जप्त करण्यास पात्र आहे असे वाटण्यास कारण असलेल्या इतर कोणत्याही वस्तू जप्त करण्याचा, वरील अधिनियमाखाली अपराधी असल्याचे आपणास वाटत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस स्थानबद्ध करण्याचा किंवा त्याची झडती घेण्याचा आणि वरीलपैकी कोणतीही गोष्ट ताब्यात असल्याचे आढळून आलेल्या व्यक्तीस अटक करण्याचा प्राधिकार आहे.

(घ) **शस्त्रांबाबत अधिनियम.**—जेव्हा आपणास एखादी अशी व्यक्ती दिसेल की, जी अनुज्ञप्तीशिवाय सशस्त्र जात आहे व जिल्हा अनुज्ञप्ती बाळगण्याबाबत सूट दिलेली नाही तेव्हा आपण त्या व्यक्तीला अटक करू शकता व तिला नि:शस्त्र करू शकता, परंतु आपण त्या व्यक्तीला व ते शस्त्र ताबडतोब प्रतिवेदनासह आपल्या फौजदाराकडे पाठवावे.

(च) **मुंबई सराईत गुन्हेगार अधिनियम, १९५९.**—या अधिनियमान्वये जिल्हा दंडाधिकारी हे सराईत गुन्हेगारांच्या हालचालीवर निर्बंध घालणारे आणि त्यांना सुधार वसाहतीत बंदिस्त करणारे आदेश काढतात. या आदेशांचे अनुपालन होत आहे आणि सराईत गुन्हेगारांनी आपणापुढे ठराविक कालांतराने उपस्थित व्हावे, असे त्यांना सांगितले असल्यास त्याप्रमाणे ते नियमितपणे उपस्थित होत आहेत हे पाहणे आपले कर्तव्य आहे. जर तसे करण्यास त्यांनी कसूर केली किंवा आपले क्षेत्र पास न घेता सोडले किंवा सुधार वसाहतीतून पळून गेले किंवा असे गुन्हेगार दुसऱ्या ठिकाणाहून आपल्या गावात अनधिकृतपणे आले तर आपण त्या संबंधीचे प्रतिवेदन पोलिसांना दिले पाहिजे. यासंबंधीच्या तपशीलावर सूचना परिशिष्ट 'क' मध्ये दिल्या आहेत.

(छ) **मुंबई देवदासी संरक्षण अधिनियम.**—या अधिनियमाखालील येणारा कोणताही अपराध घडल्यास त्याची माहिती संबंधीत उपविभागीय दंडाधिकाऱ्याला देणे या अधिनियमान्वये आपणावर बंधनकारक आहे. (अर्पण करण्यात येणाऱ्या

स्त्रीखेरीज करून) इतर कोणाही व्यक्तीने कोणत्याही हिंदू मंदिरास देवदासी म्हणून एखाद्या स्त्रीला अर्पण करण्याचा किंवा तसा उद्देश असलेला समारंभ करणे, त्यास परवानगी देणे, यात भाग घेणे किंवा त्याला प्रोत्साहन देणे हा या अधिनियमान्वये अपराध आहे.

१९२७ चा भारतीय अधिनियम सोळा, कलम ७९

(ख) भारतीय वन अधिनियम.—राखीव व आधि संरक्षित वनांमधील आगी विझवण्याच्या कामात पोलीस व वन अधिकाऱ्यांना मदत करणे आपणावर बंधनकारक आहे (२१).

केंद्रीय उत्पादन-शुल्क व मीठ अधिनियम, १९४४.

(ग) केंद्रीय उत्पादनशुल्क व मीठ अधिनियम.—या अधिनियमाच्या कलम १५ अन्वये आपण केंद्रीय उत्पादनशुल्क अधिकाऱ्यांना मदत केली पाहिजे तसेच या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाकडे कानाडोळा करणे हा एक अपराध आहे (कलम १७) अन्वये.

मुंबई शासन राजपत्र, भाग १, पृष्ठ २६९ वर प्रसिद्ध झालेला ७ मार्च १८९१ चा क्रमांक १०४८.

(घ) मुंबई (जिल्हा) तंबाखू अधिनियम (१९३३).—या अधिनियमाच्या कलम सात अनुसार दिलेल्या अनुज्ञप्तीनुसार आणि त्यातील अटी व शर्तींनुसार असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीला, कोणत्याही प्रकारचा तंबाखू विक्रीसाठी ठेवता येणार नाही किंवा दलाल म्हणून त्याचा व्यवसाय करता येणार नाही.

मात्र तंबाखूचा उत्पादक, स्वतः उत्पादन केलेला तंबाखू (बिडी, सिगारेट, सिगार आणि तंबाखूपासून बनवलेली वस्तू किंवा तंबाखूचे मिश्रण यांव्यतिरिक्त) अनुज्ञप्तीशिवाय विकू शकेल.

(३४) १९३३ चा मुंबई अधिनियम दोन, कलम ७.

३४ परंतु, (आणखी असे की,) विहित शर्तींच्या अधीन राहून राज्य शासन किंवा विहित प्राधिकरण एखाद्या व्यक्तीला अशी अनुज्ञप्ती काढण्याबाबत सूट देऊ शकेल.

(३५) १९३३ चा मुंबई अधिनियम दोन, कलम १३.

३५ त्याच अधिनियमाच्या कलम १३ अनुसार सर्व ग्राम अधिकाऱ्यांवर व ग्राम सेवकांवर राज्य शासनाला उपयुक्त अशी पुढील कर्तव्ये सोपविली आहेत :—

(क) त्यांनी, त्यांच्या लक्षात आलेला, या अधिनियमाखालील कोणताही अपराध किंवा असा अपराध करण्याचा हेतू किंवा त्याची तयारी याबाबतची माहिती, आपल्या तालुक्याच्या महालकऱ्याला किंवा तहसिलदाराला किंवा आपल्या प्रांताच्या सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्याला तात्काळ कळविली पाहिजे.

(ख) त्यांनी त्यांच्या लक्षात आलेल्या किंवा घडण्याची शक्यता आहे असे वाटण्यास कारण असणारा कोणताही अपराध घडण्यास प्रतिबंध करण्यासाठी आपल्या शक्तीच्या मर्यादितील सर्व वाजवी उपाय योजले पाहिजेत, आणि

(ग) उपरोक्त अधिकाऱ्यांना या अधिनियमातील उपबंधाची अंमलबजावणी करण्याच्या कामात मदत केली पाहिजे.

**(ठ) मुंबईचा अफू ओढण्याबाबत अधिनियम, १९३९.**—या अधिनियमाच्या कलम तीन अन्वये कोणत्याही व्यक्तीला अफू ओढता येणार नाही किंवा ओढण्यासाठी जवळ बाळगता येणार नाही किंवा या कलमाच्या परंतुकात तरतूद केल्याप्रमाणे असेल त्या व्यतिरिक्त, ओढण्यासाठी अफू तयार करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतेही साधन किंवा उपकरण जवळ बाळगता येणार नाही.

**१७.** या अधिनियमाच्या कलम २१ (अ) अन्वये प्रत्येक ग्राम अधिकारी किंवा शासनास उपयुक्त असलेला असा सेवक इ. नी त्यांच्या लक्षात आलेला, या अधिनियमाखालील कोणताही घडलेला गुन्हा आणि तो करण्याचा हेतु किंवा तयारी याबाबतची माहिती संचालक, दारूबंदी व उत्पादन शुल्क यांना किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या इतर अधिकाऱ्याला तात्काळ कळविली पाहिजे. तसेच या अधिनियमाच्या कलम २१ (ब) व (थ) अन्वये अशातऱ्हेचे अपराध घडू देण्यास प्रतिबंध करणे व या कामी नेमलेल्या अधिकाऱ्यासही अधिनियम राबविण्यास मदत केली पाहीजे.

**(ड) अस्पृश्यता (गुन्हा) अधिनियम.**—अस्पृश्यता (गुन्हा) अधिनियमानुसार, सामाजिक दृष्ट्या असमर्थ बनविणे हा अपराध ठरतो. असे अपराध बहुतांशी गावामध्ये घडतात आणि म्हणून असा कोणत्याही अपराधांची माहिती आपण पोलीस ठाण्याला कळवणे आवश्यक आहे.

**(ढ) बालविवाह प्रतिबंध अधिनियम, १९२९.**—बालविवाह ठरवणे, लावणे, आयोजित करणे किंवा निर्देशित करणे हा बालविवाह प्रतिबंध अधिनियम, १९२९ अन्वये अपराध आहे असे विवाह बहुतांशी गावामध्ये घडतात आणि म्हणून असा कोणताही अपराध घडल्याची माहिती आपण पोलीस ठाण्याला कळवणे आवश्यक आहे.

**(ण) प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९६०.**—प्राण्यांना निर्दयतेने वागवणे, अनावश्यक निर्दयतेने मारलेल्या प्राण्यांची विक्री करणे, प्राण्यांवर अधिक भार लादणे, फुका वापरणे, अनावश्यक निर्दयतेने मारलेल्या बोकडाची कातडी जवळ बाळगणे, श्रम करण्यास असमर्थ असलेल्या प्राण्यांना कोठेही कामास लावणे, झुंजण्यासाठी प्राण्यांना छेडणे, किंवा उत्तेजित करणे, रोगट प्राण्यांना मोकाट सोडणे,

के ४०१४—३ (४०,००२—९-७८)

किंवा सार्वजनिक ठिकाणी त्यांना मरू देणे हे प्राण्यांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबतच्या अधिनियमान्वये अपराध आहेत आणि म्हणून अशा कोणत्याही अपराधाची माहिती तुम्ही पोलीस ठाण्याला कळवणे आवश्यक आहे.

५. **वाहतूक.**—गावकऱ्यामध्ये वाहतुकीबाबतची जाणीव निर्माण करणे हे आपले कर्तव्य आहे. आपण त्यांच्या गाड्या व त्यांची जनावरे सार्वजनिक रस्त्यावरून हाकताना डाव्या बाजूने म्हणजे ज्या दिशेने गाड्या किंवा जनावरे जात असतील त्याच्या डाव्या बाजूने हाकणे आवश्यक आहे हे त्यांच्या मनावर आपण वेळोवेळी बिंबविले पाहिजे. त्याचप्रमाणे सायकल स्वारांनासुद्धा डाव्या बाजूने जाण्याचा नियम अनुसरण्यास सांगावे. जेव्हा एक वाहन दुसऱ्या वाहनाला ओलांडून एकाच दिशेने जात असते, तेव्हा ओलांडावयाच्या वाहनाच्या उजव्या बाजूने त्या वाहनाने पुढे जावे. जर कोणत्याही कारणाने रस्त्यावर गाडीचे जू उतरले असेल किंवा गाडी थांबवली असेल तर गाडीवाल्याने गाडी रस्त्याच्या एका बाजूला घेण्याची काळजी घेतली पाहिजे. जर एका पेक्षा अधिक गाड्या रस्त्याच्या बाजूला थांबल्या असल्या तर त्या एका शेजारी दुसरी अशा तऱ्हेने इतर वाहतुकीस रस्ता अडेल अशा न लावता एकीमागोमाग दुसरी गाडी अशा तऱ्हेने थांबवाव्या. त्याप्रमाणे पायी जाणाऱ्यांना देखील रस्त्याच्या कडेने चालण्याची व जवळ येणाऱ्या मोटार वाहनाच्या समोरून एकदम रस्ता न ओलांडण्याची शिकवण द्यावी.

(२६) शा. नि.,गृ.वि., क्र. १०८९-चार, दि. २९ जाने-वारी १९३७.

६. **आदेशिका.**—(२६) दंडाधिकाऱ्याने काढलेली समन्से व तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेले आदेश बजावणे हे आपणाकडे व कोतवालाकडे सोपवलेले काम आहे. याबाबतच्या तपशीलवार सूचना या पुस्तिकेच्या परिशिष्ट "ख" मध्ये आढळतील. या तपशीलवार आदेशांचा अभ्यास करून त्यांचे जास्तीत जास्त परिश्रमपूर्वक दक्षतेने व तत्परतेने पालन करणे हे आपले कर्तव्य आहे.

(२७) शा. नि.,गृ.वि., क्र. ४१०५, दि. २४ जाने-वारी १९३४.

७. **अभिलेख.**—(२७) आपल्या संदर्भासाठी ही पुस्तिका आपणाजवळ ठेवण्याबरोबरच आपणाला पुढील अभिलेखही ठेवावा लागेल.

हा अभिलेख नीट जतन करणे आणि तो वाळवी, पाऊस किंवा इतर निराकरणयोग्य कारणांनी खराब होणार नाही याची नीट काळजी घेणे हे आपले कर्तव्य आहे व त्याकडे आपण योग्य लक्ष दिले पाहिजे.